दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/००२/२०१७-१८
दि.१२/०१/२०१८.

माहितीचा अधिकार

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.

श्री.संतोष कुमार तिवारी, ................अपिलार्थी
सी-०४, न्यु मिरा पॅराडाईज,
जुन्या पेट्रोल पंपच्या मागे,
गिता नगर, मिरा भाईंदर रोड,
मिरारोड (पूर्व), जि.ठाणे ४०११०७

जनमाहिती अधिकारी तथा, ................प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

## -: विवेचन :-

श्री.संतोष कुमार तिवारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे दि.२९/११/२०१७ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

२०१७-१८ मिरा भायंदर मनपा मे सैनिक इंटेलिजेंस एंड सिक्युरिटी सर्विसेस द्वारा तैनात किये गये सुरक्षा रक्षको कि लिस्ट जो १०३४ है आपके द्वारा हमे पुर्व मे नाम व डयुटी का स्थान के साथ प्रदान कराई गई थी।

क: उन सभी सुरक्षा रक्षको का पोलीस वेरिफिकेशन कि प्रत प्रदान करे।

ख: उन सभी सुरक्षा रक्षको का पीएफ नंबर सह बायोडाटा साईड पत तैनाती के अनुसार प्रदान करे।

ग: सुरक्षा गार्ड बोर्ड एव श्रम मंत्रालय द्वारा जारी नियमानुसार सभी की पे स्लीप प्रदान करे।

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली नसल्याने अपिलार्थी यांनी दि.०२/०१/२०१८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१२/०१/२०१८ रोजी दुपारी १२.०५ वाजता उपस्थित राहण्याबाबत जा.क्र.मिभामनपा/ उपआ.संगणक/२०१/२०१८ दि.०५/०१/२०१८ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) व अपिलार्थी अर्जदार सुनावणीस उपस्थित आहेत.

१) **<u>अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद</u>**:- माझ्या दि.२९/११/२०१७ रोजीच्या पत्रानुसार मला माहिती दिलेली नाही.

२) **<u>जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-</u>** अपिलार्थी अर्जदार यांना माहिती देण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## -: <u>निर्णय</u> :-

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी अपिलार्थी अर्जदारास १० दिवसांत सुधारित मुद्देनिहाय माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावी. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात आले.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति:-

१) श्री.संतोष कुमार तिवारी,
सी-०४, न्यु मिरा पॅराडाईज,
जुन्या पेट्रोल पंपच्या मागे,
गिता नगर, मिरा भाईंदर रोड,
मिरारोड (पूर्व), जि.ठाणे ४०११०७

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक (आस्थापना)

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.